बुधवार दि. १७ सप्टेंबर २०१४

नवप्रभा

# माळीण आपद्ग्रस्तांसाठी मदत फेरी

**दोडामार्ग (न. प्र.)**

दोडामार्ग येथील नवनिर्माण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने माळीण आपद्ग्रस्तांसाठी निधी जमा करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दोडामार्ग बाजारपेठेमधून फेरी काढण्यात आली. या मदत फेरीस बाजारपेठेतील सर्व भाजी विक्रेते, दुकानदार, गाडीवाले आदी सर्व स्तरातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. ही मदत फेरी यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थिनी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग डॉ. एस. यू. दरेकर, प्रा. आर. ए. मोरे, प्रा. एस. एन. खडपकर, प्रा. डी. वाय. बर्वे, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे, प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे, प्रा. एस. एन. जाधव, प्रा. एम. टी. बेग, प्रा. एस. एस. पाडगावकर, प्रा. पी. एन. ढेपे आदींनी सहकार्य केले.